# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०५/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

**पोलीस ठाणे देवलापार जिल्हा नागपुर ग्रामीणने केली धडक कार्यवाही जनावरांची क्रूरतेने वाहतुक करणाऱ्या आयसर गाड़ीचा फरार चालकावर करण्यात आली कार्यवाही**

दि. १७/०५/२०२४ रोजीचे सकाळी १०/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील ठाणेदार राजेश पाटील साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा रविन्द्र मेश्राम, पो.अं. शिवचरण नागपूरे, विष्णू लहाने, मनिष चौकसे, सचिन येळकर, केशव फड यांना गुप्त बातमीदार यांचे कडून माहिती मिळाली की जबलपूर कडून नागपूरचे दिशेने एक आयसर गाडी क्र. MH-29/BE-7771 मध्ये अवैधरित्या गौवंश जनावरांची वाहतूक होत आहे. अशा गुप्त खबरी वरुन पोस्टे समोर नाकाबंदी लावली असता नाकाबंदी पाहून सदर आयसर गाडी चालकाने आपली गाडी यु टर्न घेऊन जबलपूरचे दिशेने सदर आयसर गाडी क्र. MH-29/BE-7771 ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून पळून गेला असता स्टाफसह त्याचा पाठलाग केला असता सदर वाहन हि NH 44 मोरफाटा जवळ रोडच्या कडेला सदर वाहन उभी करून तेथून चालक आरोपी फरार झाला होता. सदर आयसरची पाहणी केली असता त्यात २८ गौवंश गाय व ०२ गौवंश गोरे असे एकूण ३० गोवंशीय जनावरांना अत्यंत क्रूरपणे आखुड दोरखंडाने बांधलेल्या स्थितीत अत्यंत निर्दयतेने कोंबुन त्यांची वाहतुक करून घेऊन जात असताना मिळुन आल्याने घटनास्थळावरून आयसर गाडी क्र. MH-29/BE-7771 अंदाजे किंमती १५,०००००/—रू, व २) २८ गौवंश गाय प्रत्येकी १५,०००/—रु प्रमाणे ४,२०,०००/— रू, व ०२ गौवंश गोरे प्रत्येकी १०,०००/—रू प्रमाणे २०,०००/— रू असे एकूण ४,४०,०००/—रू असा एकूण १९,४०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करून सदर गौवंश जनावरांना पालन पोषण व देखभाल करिता गौशाळेत दाखल करण्यात आले व सदर आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम २७९ भा.द.वि. सहकलम ११ (१)(ड) प्रा.छ.प्र.अधि. १९६० सह कलम ५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. सहकलम ११९ म.पो.का. सह कलम १८४ मो. वा. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदरचा पुढील तपास पोलीस हवालदार रविंद्र मेश्राम हे करत आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी बरकते सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन देवलापार ठाणेदार स.पो.नि. राजेश पाटील, पोहवा रविन्द्र मेश्राम, पो.ना शिवचरण नागपूरे, पो. शि विष्णू लहाने, पो. शि मनिष चौकसे, पो. शि सचिन येळकर, पो. शि केशव फड यांनी केली आहे.



**<u>अवैध रेतीची चोरटी वाहतुक रणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद</u>**

**<u>वाहनासह एकुण २०,४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त</u>**

दिनांक १७/०५/२०२४ रोजी पोस्टे भिवापूर येथील पोलीस स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, टिप्पर क्र. एम एच—४०/सी एम— ६२७६ मध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) टिप्परमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा उमरेड रोड भिवापुर येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्र. एम एच—४०/सी एम— ६२७६ चा चालक **आरोपी नामे— सचिन रमेश मलोदे रा. निलज** याला स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामधील एकुण अंदाजे ०८ ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून टिप्पर क्र. एम एच—४०/सी एम— ६२७६ किंमती २०,००,०००/— रू मध्ये ८ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/— रू प्रमाणे ४०,०००/—रू. असा एकुण २०,४०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून **चालक आरोपी नामे— १) सचिन रमेश मलोदे, वय ३५ वर्ष, रा. निलज ता. पवनी जि. भंडारा २) मालक ओमप्रकाश तीवारी रा. दिघोरी नागपुर ३) नांदेड घाटचे मालक दिवांजी रा. नांदेड घाट पवनी** यांचेविरुद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३७९, १०९, ३४ भादंवि., सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार जयप्रकाश निर्मल, परि. पोलीस उपनिरीक्षक किरण महागावे, सहायक फौजदार अशोकसिंग ठाकूर, रवि जाधव, पोलीस नायक मुकेश जयस्वाल, पोलीस अंमलदार स्वप्नील ठाकरे, मनोज चाचरे, दीपक ढोले, निकेश अहिरकर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**